# उमेदवारांकरीता सूचना

१. **" पोलीस शिपाई चालक "** लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांची तात्पुरती यादी दिनांक २४-०९-२०२१ रोजी या घटकाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर गुणांबाबत उमेदवारांच्या प्राप्त हरकती / तक्रारींचे निरसन करण्यात आलेले आहे. तदनंतर अंतिम गुणपत्रक दिनांक २८-०९-२०२१ रोजी या घटकाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. **लेखी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे भरतीच्या पुढील प्रक्रियेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची १:१० प्रमाणे प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी दिनांक ०१-१०-२०२१ रोजी या घटकाच्या www.navimumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.**

३. पुढील भरती प्रक्रियेसाठी **१:१०** प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीबाबत उमेदवारांनी त्यांच्या काही हरकती असल्यास दिनांक ०२-१०-२०२१ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत या घटकाच्या **establishmentbr-nm@mahapolice.gov.in** या ई-मेलवर नोंदवाव्यात. विहित वेळेनंतर प्राप्त आक्षेपांचा / हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

४. पुढील भरती प्रक्रियेसाठी मुद्दा क्रं.२ मधील प्रसिध्द केलेल्या यादीतील पात्र सर्व उमेदवारांनी त्यांचे मुळ कागदपत्र पडताळणी साठी **"निवारा हॉल", नवी मुंबई पोलीस मुख्यालय, स्वस्थ हॉस्पिटलच्या समोर, रोडपाली, सेक्टर-१७, कळंबोली, नवी मुंबई** याठीकाणी खालील नमुद **तक्त्यात दिलेल्या दिवशी व वेळी** हजर राहावे.

| अ.क्र | बैठक क्रमांक (लेखी परिक्षेचा Seat no.) | कागदपत्र पडताळणी दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | २६४०००२ ते २६४२१५७ मधील एकुण पात्र उमेदवार २७५ | ०४-१०-२०२१ | सकाळी ०७.०० वा. |
| २ | २६४२१६२ ते २६४४४०८ मधील एकुण पात्र उमेदवार २८० | ०४-१०-२०२१ | दुपारी १४.०० वा. |
| ३. | २६४४४१० ते २६४६२६२ मधील एकुण पात्र उमेदवार २८० | ०५-१०-२०२१ | सकाळी ०७.०० वा. |
| ४ | २६४६२६४ ते २६४८२९७ मधील एकुण पात्र उमेदवार २८० | ०५-१०-२०२१ | दुपारी १४.०० वा. |

५. कागदपत्र पडताळणीसाठी हजर राहताना उमेदवार यांनी खालील नमूद **मूळ कागदपत्रे** व सदर कागदपत्राच्या छायांकित प्रतीचे **दोन संच** सोबत घेउन यावे.

- दहावी / बारावी उत्तीर्ण गुण प्रमाणपत्र व बोर्ड सर्टिफिकेट
- पदवी / पदविकाधारक / पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र (असल्यास)
- जन्मदाखला

पोलीस आयुक्त नवी मुंबई

- डोमीसाईल प्रमाणपत्र
- जातीचा दाखला (प्रमाणपत्र)
- जातवैधता प्रमाणपत्र
- खेळाडू प्रमाणपत्र व पडताळणी अहवाल (शासन निर्णय दिनांक १७-०३-२०१७ प्रमाणे)
- महिला उमेदवारांकरीता नॉनक्रिमिलेअर
- संबधित जात प्रवर्गाचा दावा करणाऱ्या संबधित प्रवर्गाचे विधीग्राहय जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात (नॉन क्रिमीलेअर ) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (अ.जा / अ.ज. वगळून)
- समांतर आरक्षण (महिलांसाठी ३० टक्के आरक्षण / खेळाडू प्रमाणपत्र / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / माजी सैनिक / अंशकालीन पदवीधर / पोलीस पाल्य / गृहरक्षक दल / अनाथ ) याबाबतची विधि ग्राहय प्रमाणपत्रे
- हलके वाहन (LMV / LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना
- ओळखपत्र (आधार कार्ड / मतदान कार्ड / वाहन परवाना)
- ऑनलाईन आवेदन अर्ज
- लेखी परीक्षा प्रवेश पत्र (ADMIT CARD )
- पासपोर्ट साईज ०६ फोटो

६. दिनांक ०४-१०-२०२१ व ०५-१०-२०२१ रोजी कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या पोलीस शिपाई चालक पदासाठीचे पात्र उमेदवारांची शारिरीक मोजमाप चाचणी दि. २१-१०-२०२१ ते दि.२३-१०-२०२१ या कालावधीत घेण्यात येईल.

७. कागदपत्र पडताळणी व शारिरीक मोजमाप चाचणीसाठी हजर राहतेवेळी उमेदवारांनी कोरोना नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच मास्क व सॅनिटायझर सोबत घेवून यावे.

८. जे उमेदवार विहित दिनांक व वेळेत हजर राहणार नाहीत त्यांना गैरहजर समजुन त्यांना भरती प्रक्रियेतून अपात्र करण्यात येईल याची सर्व संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०१-१०-२०२१
ठिकाण : नवी मुंबई

पोलीस आयुक्त नवी मुंबई

अध्यक्ष, पोलीस भरती निवड मंडळ तथा
पोलीस सहआयुक्त,नवी मुंबई यांचे आदेशानुसार